# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)
SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED
PH NO (02446)245792/248963/249362/248438/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com


जा.क्र. वैमग्रं/किमांवि/दरपत्रके मागणी/ 454 /२०२५ दिनांक:- 27 /०१/२०२५

**कार्यालयीन आदेश**

**विषय :-अग्निरोधक कुप्यांच्या नुतनिकरणाकरीता लागणाऱ्या साहित्यांचे दरपत्रक सादर करणे बाबत..**

**संदर्भ :-१.दि.१८.०४.२०२४ रोजीची खरेदी समितीची बैठक.**

**२.दि.२७.०१.२०२५ रोजीची मंजुर टिपणी.**

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयातील विविध विषयांचे विभाग, ग्रंथालय विभाग,प्रशासकीय कार्यालय व वैद्यकीय विद्यार्थी वस्तीगृहात आवश्यक असणाऱ्या अग्निरोधक कुप्यांच्या नुतनिकरणकरीता लागणाऱ्यासाहित्यांचेदरपत्रक खालील प्रमाणे यादीनुसार सादर करण्यात यावे.

तसेच सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक 03 / 02 / २०२५ रोजी दुपारी ०५:०० वा. पर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 04 / 02 /२०२५ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील.तसेच दरपत्रकधारकास दरपत्रके उघडण्याकरीता उपस्थित राहवयाचे असल्यास या कार्यालयाची काही हरकत नाही.

| अ.क्र. | साहित्यांचेनाव | प्रमाण | नग संख्या | प्रत्येकी दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | DCPRefilling of Dry Chemical Power | 10 kg | 01 nos. | |
| ०२ | DCPRefilling of Dry Chemical Power | 05 kg | 01 nos. | |
| ०३ | ABCRefilling of Dry Chemical Power | 04 kg | 01 nos. | |
| ०४ | ABCRefilling of Dry Chemical Power | 05 kg | 01 nos. | |
| ०५ | ABCRefilling of Dry Chemical Power | 06 kg | 01 nos. | |
| ०६ | ABCRefilling of Dry Chemical Power | 09 kg | 01 nos. | |
| ०७ | Water co2 | 09 liter | 01 nos. | |
| ०८ | Mechanical Foam | 09 liter | 01 nos. | |
| ०९ | DCP Fire Extinguisher CAP | .... | 01 nos. | |
| १० | Control Grip for ABC Fire Extinguisher with Complet Assoceris | .... | 01 nos. | |
| ११ | Safety pin | .... | 01 nos. | |
| १२ | Hose pipe for DCP | .... | 01 nos. | |
| १३ | Brass Spindle | .... | 01 nos. | |
| १४ | Rubber Washer | .... | 01 nos. | |
| १५ | Hose pipe for ABC F/E | .... | 01 nos. | |

**अटी व शर्ती :-**

०१.दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासन मान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र छायांकीत प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.

०२.दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, दुकान नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर,संपर्क मो.नं. नोंद असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (NA) असे नमुद करावे.

०३.दरपत्रका सोबत शासन मान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकीत प्रत, सन २०२२-२३ किंवा सन २०२३-२४ या वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न (आयटीआर) प्रमाणपत्र तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रमाणपत्र नमुना पान क्र.३ वर देण्यात आलेला आहे.)

०४.दरपत्रकातील साहित्यांचे दर शासन नियमानुसार सर्व करांसहित देण्यात आलेले आहेत किंवा करांव्यतीरिक्त देण्यात आलेले आहेत याबाबत सविस्तर नोंद करण्यात यावी. तसेच सर्व साहित्यांचे दर बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच सर्व साहित्य पुढील एक वर्ष वैध कालावधीचे व चांगल्या प्रतीचे असावे हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश तात्काळ रद्द करण्यात येतील तसेच सदर साहित्य स्वतः स्वखर्चाने एक महिण्याच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही. मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांक पासुन सहा (०६) महिण्यांपर्यंत वैध राहतील.

०५.प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

०६.उपरोक्त प्रमाणे नमुद अग्निरोधक कुप्या नुतनिकरणासाठी संबंधीत विभागातुन जमा करुन घेऊन जाणे बंधनकारक राहील. तसेच सदरील कुप्या भरल्यानंतर सदर विभागात पोहोच करणे व पोहोच पावती या कार्यालयास देयका सोबत सादर करणे बंधनकारक राहील. सदर अट मान्य असल्यास सदरील दरपत्रक सादर करावे.

०७.तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरन नाकारण्यात येतील तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदीबाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.

०८.सदर आदेशान्वये या कार्यालयाने मागणी केलेले प्रमाणपत्रच दरपत्रकासह सादर करण्यात यावे अन्यथा इतर कागदपत्र सादर केल्यास सदर दरपत्रक रद्द करण्यात येईल व याबाबत लेखी किंवा मौख्यीक स्वरुपात कळविण्यात येणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदर बाबींचे दरपत्रक सादर करावे.

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकिय महाविद्यालय,अंबाजोगाई.

प्रतः- १.संस्थेची वेबसाईट ,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

# प्रपत्र- अ

# निविदाकारांनी द्यावयाचा हमीपत्राचा नमुना

प्रमाणित करण्यात येते की, मी / आम्ही आमची संस्था ..............................................या पत्रान्वये हामी देतो की, आमचा खरेदी प्राधीकारी बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/ आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेण्याऱ्या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.तरी याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

नाव :-

ठिकाण :-

पत्ता :-

मो.नं. :-